जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २९.०१.२०२६**

'' खुनाच्या गुन्हातील फरार दोन आरोपीस मालमत्ता गुन्हे कक्षाकडून तात्काळ अटक ''

ठाणे पोलीस आयुक्तालयातील ठाणेनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ३९/२०२६ भा.न्या.सं. सन २०२३ चे कलम १०३(१) प्रमाणे दिनांक २८/०१/२०२६ रोजी दाखल असुन सदर गुन्हयात मयत इसम नामे महेश नाखवा याचा अज्ञात आरोपीने चाकूने भोकसून निर्दयी खुन केला होता.

सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेणेकामी मा पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांनी गुन्हयाचा समांतर तपास करण्याबाबतचे आदेश दिल्यानंतर नमुद गुन्हयाचा समांतर तपास करून घटनास्थळावरील सि.सि.टि.व्ही. फुटेज व तांत्रीक विष्लेशनाव्दारे ०२ संशयीत इसम नामे १) काली उर्फ रघु जयंतीभाई चौहान वय २७ वर्षे, राह. गोकुळनगर नं. १, अजी डॅम, ता.जि. राजकोट, जि. गुजरात, २) शायर विनुभाई मंग्रोलिया वय २१ वर्षे, राह. परब रोड, सोवारिया, ता. बेसान, जि. जुनागढ, राज्य गुजरात यांना नायगाव पुर्व येथील कच्छ दरबार ढाब्याजवळ मुंबई अमदाबाद हायवे या ठिकाणावरून गुजरात येथे पळून जाण्याचे तयारीत असताना ताब्यात घेण्यात आले. सदर संशयीत इसमाकडे केलेल्या कौश्यल्यपुर्ण तपासात त्यांनी इसम नामे काली उर्फ रघु याची प्रेयसी गिता माली हिस मयत इसम त्रास देत असल्यामुळे दोघांनी मयत यास चाकूने भोकसुन जिवे ठार मारले असल्याची कबुली दिल्याने दोन्ही आरोपी यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. तसेच महिला आरोपी गिता मुकेश माली हिस देखील ठाणेनगर पोलीसांनी अटक केली.

सदरची कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त गुन्हे, ठाणे, श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, शोध - २, गुन्हे, ठाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्षाचे वपोनिरी/गोरखनाथ घार्गे, पोनि/प्रताप भोसले, मपोउनि/शितल पाटील, पोउनि/संजय भिसे, सपोउनि/शिवाजी गायकवाड, पोहवा/दिनेश कुंभारे, पोहवा/जयकर जाधव, पोहवा/प्रशांत भुर्के, पोहवा/संदीप भांगरे, पोहवा/महेश साबळे, पोहवा/राहुल शिरसाठ, पोना/सचिन वानखेडे, पोना/सचिन कोळी, पोना/तौसीफ सैयद, पोअं/महेश सावंत, चापोअं/सदन मुळे, तसेच मपोहवा/आशा गोळे, मपोना/गिताली पाटील यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर